संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# पौर्णिमेलाच स्वरचंद्रिकेने घेतलेला निरोप

स्वरांच्या विश्वामध्ये शांत, नितळ आणि अनामिक असा स्वरसुगंध लाभलेल्या गायिका म्हणजे सुमन कल्याणपूर होत्या. संगीत ही साधना तर आहेच. परंतु शब्दब्रह्माच्या कृपेतून साकार होणारं हे नादब्रह्म फारच थोड्या लोकांच्या साधनेच्या तपश्चर्येचं फळ असतं. अशी कृपा लाभलेल्यांपैकी सुमनताई या स्वरचंद्रिकेचं नाव घेता येईल. मराठीतली असंख्य गाणी मराठी माणसाच्या केवळ ओठावरच नव्हे तर हृदयात घर करून बसली. आणि अशा गीतांच्या गुणगुणण्यातून जीवनाचा आत्मविश्वासही प्रदान करण्याचे काम सुमनताईंच्या अनेक गाण्यांमधून होत आलं. 'घाल घाल पिंगा वाऱ्या माझ्या परसात, माहेरी जा सुवासाची कर बरसात', या गाण्याला सुमनताईंचा स्वर लाभला. आणि प्रत्येक मराठी सासुरवाशीणीला गाण्यातून माहेरपणाचं अंगण आपोआप लाभत गेलं. गाण्यांमध्ये शब्द कवीचे किंवा गीतकाराचे असतात. त्याचा कल्पनाविलासही असतो. परंतु त्या शब्दांना जोपर्यंत नादमाधुर्य लाभत नाही तोपर्यंत ते गाणं मनाचा ठाव घेत नाही. लाखो गीतं लिहिली जातात. गायिली जातात. पण काही मोजकीच गीतं ही रसिकांच्या मनामध्ये घर करून राहतात. अशी स्वरसाधनेची शक्ती प्राप्त केलेल्या लताबाई, आशाताई, सुमन कल्याणपूर ही आघाडीची नावं ठरतात. आणि या सर्वांचा महाराष्ट्राला विशेष अभिमान वाटतो. काय योगायोग असतो पाहा 'लिंबोणीच्या झाडामागे चंद्र झोपला ग बाई', असं म्हणणाऱ्या सुमनताईंनी पौर्णिमेच्या रात्रीच आपली इहयात्रा संपवावी. जणूकाही लिंबोणीच्या झाडामागे असलेल्या चंद्राला आलिंगन द्यायला ही स्वरचंद्रिका आपल्यातून कायमची निघून गेली. जवळपास चौदा भाषांमधून हजारावर गाणी गाण्याचं काम सुमनताईंनी केलं. आणि त्यातली जवळपास सगळी गाणी लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचली. 'नाविका रे वारा वाहे रे, डौलाने हाक जरा आज नाव रे', 'जगी ज्यास कोणी नाही त्यास देव आहे', 'जिथे सागरा धरणी मिळते', या विरहगीतांबरोबरच 'केतकीच्या बनी तिथे नाचला ग मोर', 'केशवा माधवा तुझ्या नामात रे गोडवा', अशा एक ना अनेक गाण्यांमधून स्वरांनाच एक कोमल सुमन बहाल करण्याचे काम कल्याणपूर यांनी केलं.

### स्वरसाधनेची तपश्चर्या

पूर्वीच्या ढाका इथे २८ जानेवारी १९३७ ला त्यांचा जन्म झाला. पूर्वाश्रमीच्या या सुमन हेमाडी नंतर रामानंद कल्याणपूर यांच्याशी विवाह होऊन सुमन कल्याणपूर झाल्या. त्यांचे वडील सेंट्रल बँक ऑफ इंडियामध्ये कामाला होते. मुंबईत बदली झाल्यानंतर हे सगळं कुटुंब मुंबईत स्थायिक झालं होतं. सुमनताई या खऱ्या अर्थाने कलासक्त होत्या असे म्हणता येईल. अगदी आपल्या मनातल्या चित्रांना साकार करता यावं म्हणून त्यांनी जे जे स्कूल ऑफ आर्टमध्ये प्रवेशही घेतला होता. परंतु त्यांच्यातल्या संगीतकलेने त्यांना स्वरसाधनेकडे खेचून आणलं. पंडित केशवराव भोळे, पंडित लक्ष्मणराव अमृते किंवा उस्ताद खान अब्दुल यांच्याकडून त्यांना मिळालेले शास्त्रीय संगीताचे शिक्षण त्यांच्यासारख्या उपजत कलाप्रेमीला पुरेसे ठरले. आणि तिथून त्यांच्या संगीत कलेची धडाडी सुरू झाली. यशवंत देव यांच्याकडेही त्यांचं शिक्षण झालं होतं. कालांतराने त्यांचा हिंदी चित्रपटसृष्टीत प्रवेश झाला. आणि तिथेही त्यांनी आपल्या आवाजाची अशी काही जादू निर्माण केली की आणि असंख्य चित्रपट गीतं सुमनताईंमुळे लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचली. ज्यामध्ये 'ना ना करते प्यार तुम्हीसे कर बैठे', 'आजकल तेरे मेरे प्यार के चर्चे हर जुबान पर' यासारख्या गीतांनी हिंदी चित्रपटसृष्टीला एका कोमल स्वरगंधारचीच प्राप्ती झाली. १९५० च्या दशकात त्यांचे पार्श्वगायन सुरू झाले आणि जवळपास पन्नास वर्षे अव्याहत सुरू होतं. प्रसिद्धीचा हव्यास नाही. स्वतःभोवती आरत्या ओवाळून घेण्याची सवय नाही. कोणतीही स्पर्धा न करता सुमनताईंनी स्वरसाधनेचं व्रत निष्ठेने सांभाळलं होतं. त्यांनी ज्या ज्या गाण्यांना स्वरसाज चढवला त्या सर्व गाण्यांचे कल्याण झाले, असे म्हणायला हरकत नाही. कारण गाण्याचा तोल सांभाळण्यासाठी संगीताचा तालही अतिशय महत्त्वाची भूमिका बजावत असतो. कुठेही तोल जाऊ न देता त्यांनी केलेली स्वरसाधना त्यासाठीच अजरामर ठरते.

### कमावलेल्या आवाजाचे देणे

प्रत्येक व्यक्ती आयुष्यामध्ये नाव कमावण्याची धडपड करत असतो. परंतु हे भाग्य सगळ्यांच्या वाट्याला येत नाही. कमावलेल्या आवाजातून मिळणारी ओळख नाव कमावणारी तर ठरतेच. परंतु आयुष्यभर जपलेल्या आपल्या स्वरसाधनेलाही अजरामर करून जाते. म्हणूनच सुमनताईंनी म्हटलेलं 'आदमी मुसाफिर है, आता है जाता है, आते जाते रस्ते मे यादे छोड जाता है' जीवनचक्राच्या या सनातन परंपरेत शेवटी आठवणींचा दरवळच मागे राहतो. आणि पुढचा काही काळ तो अनेकांना आश्रय देत राहतो. सुमनताईंच्या या समधुर गाण्याच्या आठवणीचा दरवळ असाच प्रदीर्घ काळ रसिकांच्या मनात रेंगाळत राहील. एखाद्या व्यक्तिमत्त्वाची छाप ही अतिशय साधेपणातूनही किती प्रभाव निर्माण करून जाते याचे अगदी ठळक उदाहरण म्हणजे सुमनताईंची जीवनशैली होती. त्यांच्या आवाजाची नेहमीच लतादिदींच्या आवाजाशी तुलना व्हायची. परंतु त्या कोणत्याही स्पर्धात्मक चक्रव्यूहात अडकल्या नाहीत. स्वभावाने शांत राहत या संगीतमय चित्रपटांच्या दुनियेतही स्वरांच्या इतकीच स्वतःची शालिनता जपण्याचे काम त्यांनी केलं. आणि म्हणून सोज्ज्वळ सुस्वभावी व्यक्तिमत्व म्हणून त्या वेगळा ठसा उमटवून गेल्या. त्यांच्या या गोड, नितळ आणि मधाळ गळ्याने गंधयुक्त हे सुमनस्वर त्यांच्यानंतरही रसिकांना आकर्षित करीत राहणार आहेत. महाराष्ट्राच्या वाट्याला आलेल्या स्वरांच्या माळेतला आणखी एक मणी ओघळलेला आहे. ही सगळी स्वरसाधना तपश्चर्येचं वरदान होतं यात काही शंका नाही. सुमनताईंनी इथे टिकून राहण्यापेक्षाही टिकवून ठेवणारं मोठं कर्तृत्व सिद्ध केलं.